वाचा :-

१. समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. बिजीटी २०००/प्रक्र१५५/ अर्थसंकल्प मंत्रालय मुंबई दिनांक ४ नोव्हेंबर २०००
२. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकाण-१००२ प्र.क्र. १२८ अर्थोपाय दिनांक ६ जून २००८
३. सामाजिक न्याय व विशेष विभाग शुध्दीपत्रक क्रमांक दवसु २००८/ प्र.क्र. ५२४/ विघयो-१ मंत्रालय मुंबई -३२ दिनांक १४ नोव्हेंबर २००८
४. सामाजिक न्याय व विशेष विभाग शुध्दीपत्रक क्रमांक दवसु २००८/ प्र.क्र. ५२४/ विघयो-१ मंत्रालय मुंबई -३२ दिनांक १९ डिसेंबर २००८
५. सामाजिक न्याय व विशेष विभाग निर्णय क्रमांक दवसु २०११/ प्र.क्र.४४२/ अजाक/ मंत्रालय मुंबई दिनांक ५. डिसेंबर २०११
६. सामाजिक न्याय व विशेष विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक दवसु २०११/ प्र.क्र.४४२/ अजाक/ मंत्रालय मुंबई दिनांक ३१ डिसेंबर २०११
७. सामाजिक न्याय व विशेष विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक दवसु २०११/ प्र.क्र.४४२/ अजाक/ मंत्रालय मुंबई दिनांक ०२ जुलै २०१२
८. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन शुध्दीपत्रक दिनांक २० डिसेंबर २०११
९. शासन आदेश विघयो- २०१३/प्र.क्र. ७१/विघयो १३.०२.२०१४
१०. सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई शासन शुध्दीपत्रक दि ०१ जुलै २०१३
११. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन शुध्दीपत्रक दिनांक ८ मार्च २०१६
१२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२१/प्र.क्र.७९/अजाक, दि.०६/१०/२०२१
१३. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारीजिल्हापरिषदअमरावती यांचे मंजूर निवड यादी क्रं.५९३ दि.११/०३/२०२४
१४. मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव अनु जाती उपयोजना अमरावती यांचे प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश जा.क्र. सआसकअम/अजाउयो/प्रमा+निधी वितरण/आदेश/२०२२-२३/४४५१, अमरावती दि. २६/०८/२०२३

---

**जिल्हा परिषद अमरावती**
**कार्यालय- समाज कल्याण विभाग ,**

---

जा. क्र./जिप/सकवि/अजानबौ. व वि/प्रमाआ/६०३/ २०२३-२४ दिनांक. ११/०३/२०२४

## // प्रशासकीय मंजूरी आदेश //

ज्या अर्थी उपरोक्त क्र. १ चे शासन निर्णयाचे नुसार अनुसुचित जाती व नववौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे (द.व.सू) योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.ज्या अर्थी अनु. जाती व नववौध्द घटकांच्या वस्तीचा विकास योजने अंतर्गतची कामाना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार दि. ०५ डिसेंबर २०११ चे शासन निर्णयाप्रमाणे मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमानुसार प्रदान करण्यात आले आहे.

ज्या अर्थी अनुसुचित जाती व नववौध्द घटकाचे वस्तीचा विकास करणे (द.व.सु) योजना करीता वाचा क्र.१३ नुसार योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता कामाच्या निवडयादीस मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी मान्यता दिलेली आहे. सदर यादीतील कामांना सन २०२३-२४ मध्ये प्राप्त होणाऱ्या निधीच्या आधीन राहून प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे.

त्या अर्थि मी **संतोष जोशी** अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती अनुसुचित जाती व नववौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे(द.व.सु.) या योजनेअंतर्गत खालील **परिशिष्ट -अ** मध्ये दर्शविलेल्या ग्रामपंचायतींनी प्रस्तावीत केलेल्या रेखाकन (लोकेशन) वरील रु. १९,४२,२४,०००/- (रुपये एकोनवीस कोटी बेचाळीस लक्ष चोवीस हजार फक्त) च्या ४९२ कामांना शासनाकडून तरतुद प्राप्त होण्याच्या आधीन राहून प्रशासकीय मंजूरी प्रदान करीत आहे.

वरील मंजूर रक्कम सन २०२३-२४ या वित्तीय वर्षामध्ये खालील लेखाशिर्षा खाली खर्च करण्यात यावी. मंजूर रक्कमेपेक्षा जादा खर्च करण्यात येवू नये. दरमहा झालेल्या खर्चाचा अहवाल समाज कल्याण विभागाकडे सादर करण्यात यावा.

**लेखाशिर्ष:-** २२३५ अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्गीयंचे कल्याण ०१- अनुसुचित जातीचे कल्याण ८०० इतर खर्च पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, राज्य योजना अंतर्गत योजना (०६)(०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ यांच्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने- अनुसुचित जाती व नववौध्द घटकाच्या वस्तीचा विकास यांची सुधारणा(२२२५-E७१२) (३०५-५)३१- सहाय्यक अनुदाने(वेतनेत्तर)

प्रतिलीपी:-

१) मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जि.प. अमरावती यांना आवश्यक कार्यवाही करिता रवाना.

२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प. अमरावती यांना आवश्यक कार्यवाही करिता रवाना.

३) कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा/ बांधकाम जि.प. अमरावती आपण मंजुर कामांना त्वरीत तांत्रिक मंजूरी प्रदान करावी व तसा अहवाल माझ्याकडे स्वतंत्रपणे सादर करावा व तांत्रीक मंजूरी प्राप्त अंदाजपत्रकाची एक प्रत या कार्यालयाकडे पाठवावी.

४) उप अभियंता ग्रामिण पाणी पुरवठा/ बांधकाम उप विभाग............................ आपण मंजूर कामांना त्वरीत तांत्रीक मंजूरी प्रदान करावी व तसा अहवाल माझ्याकडे स्वतंत्रपणे सादर करावा व तांत्रीक मंजूरी प्रत अंदाजपत्रकाची एक प्रत या कार्यालयाकडे पाठवावी. तसेच आपले अधिनस्त असलेली कामे विहीत मुदतीत पुर्ण करुन घेण्याचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी तसेच मंजूर कामांचे रेखांकन (अनुसुचीत जाती) वस्तीतच लोकेशनवर देण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

५) गट विकास अधिकारी पंचायत समिती...................... आपण व सोबत जोडलेल्या निकष व अटी तसेच शासन निर्णय दिनांक १४.११.२००८ व ०५.१२.२०११ अन्वये व शासन शुध्दीपत्रक दिनांक ०२ जुलै २०१२ नुसार व २० डिसेंबर २०११ चे शुध्दीपत्रकानुसार उपरोक्त मंजूर कामे पुर्ण करावी. मंजुर बांधकाम अनुसुचीत जाती वस्तीचे बाहेर व मुळ सादर केलेल्या प्रस्तावामध्ये प्रस्तावित असलेल्या अनुसुचीत जाती वस्तीमधीलच मुळ लोकेशनवर नियमानुसार बांधकामे करावी लोकेशन मध्ये बदल करण्यात येवू नये.

६) सहाय्यक लेखा अधिकारी पंचायत समिती........................आपण खर्चाची नोंद दिलेल्या लेखाशिर्षाखाली घ्यावी लेखाशिर्षामध्ये बदल झाल्यास संर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

७) सरपंच/सचिव ग्रामपंचायत...............................मंजुर बांधकामावर ग्राम पंचायतीची मंजुरी घेवून खर्च करावा, सदर खर्चास ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत मंजुरी घ्यावी. तसेच पाणी पुरवठयाच्या कामाकरीता शासन निर्णय दिनांक २४.०१.२००५ अन्वये लोकवर्गणी ५ टक्के रोख स्वरुपात पाणी पुरवठा निधीत जमा करावे. ग्राम पंचायतीने ग्राम सभा/मासिक सभा ठरावानुसार मुळ सादर केलेल्या प्रस्तावामध्ये प्रस्तावित असलेल्या अनुसुचीत जाती वस्तीमधीलच मुळ लोकेशनवर नियमानुसार बांधकामे करावी लोकेशन मध्ये बदल करण्यात येवू नये. काम मंजूर झाल्यापासून कोणत्याही परिस्थित एक वर्षाचे आत काम पुर्ण करावे.

(राजेंद्र जाधवर)
जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

(संतोष जोशी)
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

## अनुजाती व नवौध्द घटकाच्या वस्ती सुधार योजना निकष अटी

### अटी व शर्ती

१) सन २०२३-२४ मध्ये शासनाकडून तरतुद प्राप्त होण्याच्या आधीन राहून सदरची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तरतूद प्राप्त होताच वित्तप्रेषणाने निधी पंचायत समितीला उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जि.प. अमरावती हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. तीन लक्ष रुपये पेक्षा जास्त किंमतीचे कामांना शासन स्तरावर ई-टेंडरींग करणे अनिवार्य आहे. मंजुर रक्कमेपेक्षा आराखडया प्रमाणे लागणारी जास्त रक्कम ग्रामपंचायतीने आपल्या फंडातून किंवा लोक वर्गणीतून किंवा श्रमदानाने उपलब्ध करुण काम पुर्ण करावे.

३) पंचायत समितीने वित्त विप्रेषन प्राप्त झाल्यावर दलित वस्ती मध्ये पिण्याच्या पाण्याची कायम स्वरुपी सोय आहे याबाबतची खात्री करुन तसे प्रमाणपत्र गट विकास अधिकारी पं.स. यांनी द्यावे. तसेच मौजे.......................... येथील दलित वस्तीतील.......................... हे काम संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना वित्तीय स्त्रोत ५० टक्के मधून, यशवंत ग्राम समृध्दी योजना व इतर अन्य योजनेतून घेण्यात आले नाही असे प्रमाणपत्र ग्राम पंचायती कडून प्राप्त झाल्यानंतर गट विकास अधिकारी पं.स. यांनी ग्रामपंचायतीच्या नावाने रेखांकित धनादेशाव्दारे अनुदान नियमानुसार वितरीत करावे.

४) प्राप्त अनुदानाची रक्कम गट विकास अधिकारी पंचायत समिती व ग्रामसेवक, ग्रामपंचायत यांच्या नावे उघडण्यात आलेल्या संयुक्त खात्यात जमा करावी.

५) ग्राम सेवकाने खात्यातून या योजनेचे पैसे काढतांना ग्राम पंचायतीची मंजुरी/ ठराव घेवूनच कारवाई करावी. मंजूर केलेली कामे आराखडया प्रमाणे पुर्ण करुन घेणे बाबत गट विकास अधिकारी यांनी संबंधीत ग्राम पंचायती सोबत करारनामा करुन घ्यावा.

६) तालुक्यातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे(द.व.सु.) या योजने अंतर्गतची मंजूर काम करण्याकरीता कामे वाटपाची कार्यवाही गट विकास अधिकारी यांनी शासन निर्णय दिनांक ०५ डिसेंबर २०११ व शासन शुध्दीपत्रक दिनांक ०२ जुलै २०१२ नुसार आपले स्तरावरुन करावी.ज्या जागेवर बांधकाम इत्यादी करावयाचे आहे, ती जागा ग्राम पंचायतीचे मालकीची असल्याबाबत खात्री करुनच कामास सुरवात करावी. सदर काम दलित वस्तीतच व मुळ प्रस्तावीत लोकेशनवरच आहे. याची खात्री संबंधीत ग्राम पंचायतीचे ग्राम सेवकाने करुन घ्यावी.,सदर कामाची अंमलबजावणी त्या विशिष्ट पंचायत समितीचे उप अभियंता आणि संबंधीत गट विकास अधिकारी यांच्या सल्याने करण्यात यावी. कामावर प्राथमिक नियंत्रण गट विकास अधिकारी संबंधीत, उपअभियंता व जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता यांची राहील.

७) **रक्कम मंजुर झालेल्या दिनांकापासून ग्रा.पं.ने बांधकाम तिन महिने ते एक वर्षाच्या आत पुर्ण करावे एक वर्षाच्यावर कालावधी जाणार नाही याची दक्षता घ्यावी. ही जबाबदारी त्या त्या तालुक्याचे गट विकास अधिकाऱ्यांची राहील गावातील काम अपूर्ण राहील्यास त्या ग्राम पंचायतीला पुढील दोन वर्षा करीता निधी देण्यात येणार नाही.** सदरचा निधी हा सन २०२३-२४ चा असल्याने उपरोक्त कामे हि ३१ मार्च २०२५ अखेर पूर्ण करण्यात यावे.

८) मंजूर कामाचा निधी प्राप्त झाल्यानंतर ग्रा.प.ने एक वर्षाच्या आत बांधकाम पुर्ण न केल्यास ग्रा.पं. कडून रक्कम वसूल केली जाईल याची जाणीव संबेधीत गट विकास अधिकारी यांनी ग्रा.पं. ला करुन द्यावी. दरमहा खर्चाचा अहवाल समाज कल्याण अधिकारी व मु.ले.वि.अ.जि.प. अमरावती यांना सादर करावा.

९) जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी तिमाही अहवाल संचालनालयास व विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे सादर करावा.

१०) मंजूर झालेल्या कामासाठी जिल्हा परिषदेने पंचायत समिती कडे वितरीत केलेल्या ९० टक्के रक्कमेमधून खालील प्रमाणे रक्कम पंचायत समिती मार्फत ग्रामपंचायतीस अदा करावे.

**अ: पहिला हप्ता:-** काम सुरु होण्यापुर्वी कार्यकारी अभियंता/ उप अभियंता यांचे कडून मंजूर कामाचे प्रोलनास तांत्रीक मंजूरी प्राप्त झाल्यानंतर व संबंधीत अभियंता यांनी रेखंकन करुन दिल्यावर कामे सुरु करण्यात यावी या अटीवर मंजूर रककमेचा २५ टक्के रक्कमेचा ग्रामपंचातीस अदा करावी(रेखांकनाचा दिनांक नमुद करुन अहवाल घेण्यात यावा) त्यानंतर प्रत्यक्षात झालेल्या कामाचे मुल्यांकनानुसार त्या त्या प्रमाणात रक्कम शासन निर्णय दिनांक ०५ डिसेंबर २०११ चे परिशिष्ट अ मधून मुद्दा क्रमांक ११ नुसार अदा करावी. (मुल्यांकन करीत असतांना त्यावर दिनांक नमुद करण्यात यावा)

**ब- अंतिम हप्ता:-** मंजुर काम पुर्ण झाल्यानंतर संबंधीत उप अभियंता यांचा पुर्णत्वाचा दाखला कार्यकारी अभियंता, विस्तार अधिकारी पंचायत व ग्राम सेवक यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र कामा पुर्वीचा व काम पुर्ण झाल्यानंतरचा आणि कामावर लावलेल्या माहिती फलकाचा फोटो व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे तपासणी नंतरच व बं ाधकाम साहित्य संबंधात विक्रीकर व आयकर ग्राम पंचायतीने वसुल करुन शासन खाती जमा केला असल्याची खात्री झा़ल्यानंतरच नियमानुसार उर्वरीत १० टक्के रक्कम संबंधीत ग्रा. पं. ला अदा करण्यात यावी. तसेच पाणी पुरवठयाचे मंजूर झालेले काम व इतर बांधकाम पुर्ण झाल्यानंतर दुरुस्ती व देखभाल या बाबीवर ग्रा.पं. तीला खर्च करावा लागेल व करण्यात आलेल्या कामाकरीता भविष्यात दुरुस्ती व देखभालीचा कोणताही खर्च शासनाकडून

११) सदर योजनेखाली मंजूर आराखड्याप्रमाणे सर्व काम पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी [illegible] अधिकारी व उप अभियंता यांची राहील. [illegible] बाहेर मूल्यांकन करुन घेण्यात येवू नये.

१२) या योजनेखाली अपूर्ण राहीलेली कामे पूर्ण करुन घेणे व शिल्लक राहीलेली रक्कम [illegible] जमा करणे/ वित्त विभागाकडे जमा करणे याची सर्वस्वी जबाबदारी गट विकास अधिकारी पंचायत समिती यांची राहील. या योजनेखाली लेख्याची लेखा परिक्षणात तसेच अन्य तपासणी मध्ये उपस्थित झालेले [illegible] व त्याबाबत आलेल्या त्रुटी तसेच अनुपालन अहवालाबाबतची पूर्तता इत्यादी बाबींची सर्व जबाबदारी गट विकास अधिकारी यांच्यावर राहील.

१३) योजने खालील जी कामे हाती घेण्यात आलेली आहे त्या कामाचा उपयोग सदर वस्तीतील अनुसूचीत जातीला होईल याची दक्षता घ्यावी व त्याचे उपयोगीता प्रमाणपत्र हे जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडे संबंधीत तालुक्याचे गटविकास अधिकारी यांनी सादर करावे.

१४) अनु. जाती व नवबौध्द वस्ती सुधार योजनेखाली मंजूर केलेली रक्कम ही कोणत्याही अन्य कामासाठी वळते करता येणार नाही तसे घडल्यास गट विकास अधिकारी , सहाय्यक लेखाधिकारी पंचायत समिती व ग्राम सेवक यांना जबाबदार धरण्यात येईल.

१५) पाणी पुरवठया करिता कुपनलिका/ विहीरी चा प्रस्ताव असल्यास पाणी उपलब्ध असल्याबाबतचे प्रमाणपत्र उप अभियंता भूजल सर्वेक्षण विभाग, जि.प. अमरावती यांचेकडून प्राप्त झाल्यानंतरच काम सुरु करावे.

१६) गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी उपरोक्त कामाचे तांत्रिक मान्यता उपअभियंता/कार्यकारी अभियंता (बांध/पापु) यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी.

१७) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करण योजनं अंतर्गत कामाचे दर्शनी ठिकाणी फलक लावण्यात यावा व फलका वर खालील बाबी नमुद कराव्यात.

**फलक तक्ता**

अनुसूचीत जाती उपयोजना अंतर्गत
अनुसूचित जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे (दवसु) योजना
सन २०२०-२१
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती
पंचायत समिती ---------------------------------- ग्रामपंचायत ----------------------------------------------
गावाचे नांव......................... .......................वस्तीचे नाव......................... ......................
कामाचे नाव........................ ........................मंजुर रक्कम......................... ......................
वर्ष.......................... ..........................प्राकलनाची किंमत......................... ......................
प्रशासकीय मान्यता क्रमांक दिनांक व मंजुर रक्कम.........................................
तांत्रीक मान्यता क्रमांक व दिनांक........................................ .....................
काम सुरु कल्याचा दिनांक........................................... .....................
झालेला खर्च........................................................... .....................
प्रत्यक्ष मुल्यांकन....................................................... .....................

१८) बांधकामा संबंधीच्या सर्व नोंदी बांधकाम विभागांच्या तांत्रिक अधिकाऱ्यानी पंचायत समितो च्या बाधकाम विषयक नोंद वही मध्ये दिनांका सह नमुद करुन घेण्यात याव्या.

१९) बांधकाम सुरु असतांना बांधकामाचे साहित्य प्रयोगशाळेकडे तपासणी करिता उप अभियंता याचे पत्र घेवून पाठविण्यात यावे व त्याची प्रत कार्यकारी अभियंता बांधकाम/जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प. अमरावती ग्राम सडक योजना जि.प. अमरावती येथील प्रयोगशाळेतून करुन घ्यावी.

२०) ज्या वस्तीमध्ये समाज मंदिराचे काम मंजूर झाले असेल त्यागावांमध्ये यापुर्वी समाजमंदिर असल्यास दुसरे समाज मंदिर देता येणार नाही अशावेळी संबंधीत ग्रामपंचायतीकडून कामबदल प्रस्ताव घेण्यात यावा व सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव समाज कल्याण विभाग, जि.प. यांचेकडे सादर करण्यात येत यावा.

(राजेंद्र जाधवर)
जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

(संतोष जोशी)
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती